**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार, दिनांक १० जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **दूधात भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत ग्वाही.**
2. **आयकर अधिकाऱ्यांनी डीजीटली सक्षम राहणे आवश्यक- नागपूरच्या प्रधान मुख्य आयकर आयुक्त रीना त्रिपाठी यांचं 'उत्तरायण' या प्रशिक्षण वर्गाच्या उदघाट्न प्रसंगी प्रतिपादन.**
3. **निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचार केल्याच्या आरोपावरून सीएसआयआर - नीरी नागपूरचे तत्कालीन संचालक, चार शास्त्रज्ञ आणि पाच खासगी कंपन्यांसह दहा आरोपींविरुद्ध सीबीआयने नोंदवले तीन स्वतंत्र गुन्हे.**

**आणि**

4. **नवीन गुन्हेगारी कायद्यासंदर्भात नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र सिंगल यांच्या मुलाखतीचं आकाशवाणीवर उद्या सकाळी ९.३० वाजता होणार प्रसारण.**

****

विधानसभा

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज अकरावा दिवस आहे. विरोधी पक्षाच्या आमदारांनी आजही विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं करत, हिट ॲण्ड रन, महिला सुरक्षा आदी मुद्यांवरून घोषणाबाजी केली. राज्यात भेसळयुक्त पदार्थ तपासण्यासाठी सध्या असलेल्या प्रयोगशाळा कमी पडत असल्यामुळे खासगी सहभागातून अशा प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी एक प्रस्ताव तयार करण्यात येत असून, तो मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी सादर केला जाईल, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन खात्याचे मंत्री धर्मराव अत्राम यांनी दिली. यासंदर्भात या खात्याला अधिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येईल तसंच सरकार याबाबत कडक भूमिका घेईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या चर्चेत हस्तक्षेप करत दिली. मराठा तसंच ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून आज विधानसभेत गदारोळ झाला. याबाबतच्या बैठकीला विरोधी पक्षाचे नेते उपस्थित न राहिल्याचं सत्ताधारी पक्षाकडून सांगण्यात येताच, विरोधकांनी आणि त्याच्या उत्तरात सत्ताधारी बाकावरच्या आमदारांनी घोषणाबाजी सुरू केली. यावर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सदनाचं कामकाज आधी पाच मिनिटं आणि नंतर दहा मिनिटांसाठी तहकूब केलं.केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा फायदा घेणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले जातील, अशी

माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. ते आज विधानसभेत संजय सावकारे यांच्या प्रश्नाच्या उत्तरात बोलत होते. आरक्षणाच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या गदारोळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्या सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर केल्या आणि कोणत्याही चर्चेशिवाय गदारोळात या मागण्या मंजूर करण्यात आल्या. त्यानंतर कर विषयक कायदे सुधारणा विधेयक, महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध आणि महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्गास प्रतिबंध करणारं विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यानंतर विधानसभेतील कामकाज स्थगित झाले.

विधानपरिषद कामकाज

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याचा मुद्दा आमदार प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत मांडल्यावर विरोधक आणि सत्ताधारी पक्षांच्या आमदारांनी हौद्यात उतरून प्रचंड गोंधळ आणि घोषणाबाजी केली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही शांतता प्रस्थापित न झाल्याने या गदारोळातच पुरवणी मागण्या एकमताने मंजूर करण्यात आल्या. गदारोळ सुरूच राहिल्याने विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

मराठा आरक्षण

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आज सत्ताधारी आणि विरोधी पक्षात खडाजंगी पाहायला मिळाली. स्वतःची कातडी वाचविण्यासाठी मराठा आरक्षणावर चर्चा न करता विधान परिषदेत सत्ताधारी आणि उपसभापती यांनी संगमताने दिवसभराचे कामकाज तहकूब केल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. सभागृह तहकूब केल्यामुळे विरोधी पक्षांनी आज विधिमंडळाच्या पायऱ्यांवर घोषणा देत निषेध नोंदवला. राज्यात आरक्षणाचा प्रश्न गंभीर होण्यास महायुती सरकारच जबाबदार आहे. सरकारमध्येच आरक्षण प्रश्नावर एकमत नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला. तर सरकारला असहकार्य करण्याची आडमुठी भूमिका विरोधकांनी घेतली आहे. मराठा ओबीसीच्या आरक्षणाचा वाद चिघळत ठेवून महाराष्ट्रातील शांतता भंग करायची असल्याचा आरोप करत राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी विरोधकांना खडे बोल सुनावले.

योजना दूत

राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांबद्दल जनजागृती करण्यासाठी पन्नास हजार युवकांची, योजना दूत, म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. उच्च आणि तंत्रज्ञान शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती दिली.

एनएडीटी 'उत्तरायण'

'आयकर विभागात काम करत असताना आयकर अधिकाऱ्यांनी डीजीटली सक्षम राहणे आवश्यक असून आयकर विभागाच्या फेसलेस असेसमेंट, सायबर फॉरेंसिक्स तसेच डिजिटल सबमिशन यासारख्या उपक्रमांमध्ये कौशल्य संपादन करून ते करदात्यांना उत्तम सेवा उपलब्ध करून देवू शकतात' असं प्रतिपादन नागपूरच्या प्रधान मुख्य आयकर आयुक्त रीना त्रिपाठी यांनी आज केलं. आयकर अधिकाऱ्यांमधून पदोन्नती मिळालेल्या आयकर सहायक आयुक्त यांच्या 'उत्तरायण' या प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटन प्रसंगी नागपूरस्थित राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकॅडमी एनएडीटी इथं त्या बोलत होत्या. याप्रसंगी एनएडीटीचे प्रशिक्षण महासंचालक आनंद बैवार, अतिरिक्त महासंचालक (प्रशासन) मनीष कुमार तसेच 'उत्तरायण' या प्रशिक्षणाचे संचालक आणि अतिरिक्त महासंचालक आकाश देवांगण हे प्रामुख्याने उपस्थित होते. या तुकडीमध्ये 131 अधिकारी प्रशिक्षणार्थी असून, त्यापैकी 38 महिला प्रशिक्षणार्थी आहेत. सर्वात जास्त संख्या महाराष्ट्र राज्यातल्या अधिका-यांची आहे. या तुकडीचे सरासरी वय 54 वर्ष असून या तुकडीतील अधिका-यांनी सुमारे 20 ते 25 वर्ष सेवा आपल्या विभागात दिल्यानंतर त्यांना ही पदोन्नती मिळाली आहे. आयुक्त त्रिपाठी यांनी, नव्याने पदोन्नती मिळालेल्या सहाय्यक आयुक्तांना 'आपल्या नियंत्रणाखालील परीक्षावधीन अधिकाऱ्यांना आपल्या अनुभवाचं आदान प्रदान करण्याचं' आवाहन यावेळी केलं.

नीरी-सीबीआय

निविदा प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार केल्याच्या आरोपावरून सीएसआयआर-निरी अर्थात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्था नागपूरच्या तत्कालीन संचालक आणि चार शास्त्रज्ञ तसेच पाच खाजगी कंपन्यांसह दहा आरोपींवर सीबीआयनं तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहे. या संदर्भात चार राज्यातील 17 ठिकाणी शोध मोहीम देखील राबवली जात असल्याचं, या संदर्भात जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलं आहे. केंद्रीय अन्वेषण विभागानं सीईओ सीएसआयआर नवी दिल्ली यांच्याकडून मिळालेल्या

तक्रारीच्या आधारे गुन्हेगारी कट रचणे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून पाच सरकारी कर्मचाऱ्यांसह दहा आरोपींवर गुन्हे दाखल केले आहे. यासंदर्भात पुढील कारवाई सुरू आहे. या संदर्भात पुढील कारवाई सुरु आहे.

रवींद्र सिंगल-आकाशवाणी

नव्या गुन्हेगारी कायद्यासंदर्भात जनजागृती व्हावी याकरिता आकाशवाणी नागपूरच्या वृत्त विभागाच्या वतीने प्रसारित करण्यात येणाऱ्या दृष्टिक्षेप या कार्यक्रमासाठी नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र सिंगल यांनी आज आकाशवाणी नागपूर इथं भेट दिली. प्रादेशिक वृत्त विभागाच्या वृत्त निवेदिका रेवती जोशी यांनी पोलिस आयुक्तांची मुलाखत घेतली. ही मुलाखत उद्या गुरुवार दिनांक 11 जुलै रोजी सकाळी 9.30 वाजता आकाशवाणीच्या नागपूर केंद्रावर 585 किलो हर्टज्‌वर तसेच न्यूज ऑन एअर या अ‍ॅपवर ऐकली जाऊ शकते. प्रादेशिक वृत्त विभागाच्या 'मराठी न्यूज नागपूर ऑल इंडिया रेडिओ' या युट्यब वाहिनीवर सुद्धा या मुलाखतीचे प्रक्षेपण करण्यात येणार आहे. 'आकाशवाणी हे एक महत्त्वाचं माध्यम असून, त्याने सामाजिक बदलांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे' असं प्रतिपादन यावेळी रवींद्र सिंगल यांनी केलं.

भूकंप

विदर्भातील वाशीम जिल्ह्यासह मराठवाड्यात नांदेड, हिंगोली, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर इथं आज सकाळी सव्वा सातच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. वाशिम जिल्ह्यातील काही गावात नागरिकांना सकाळी सव्वा सात ते साडेसात च्या दरम्यान भूकंपाचा धक्का जाणवला. हिंगोली जिल्ह्यात वसमत, औंढा, कळमनुरी, हिंगोली या भागात पहाटे भूगर्भातून आवाज येऊन भूकंपाचे हादरे बसले, तर परभणी जिल्ह्यातही भूकंपाचे सौम्यधक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यातल्या रामेश्वर तांडा ते वसमत तालुक्यातल्या पांगरा शिंदे या गावापर्यंत होता. या धक्क्यानं हिंगोली जिल्ह्यातल्या पेठ वडगाव इथल्या ऐतिहासिक किल्ल्याचा बुरुज ढासळून मोठी पडझड झाली. नांदेड शहरात सकाळी भूकंपाचे हादरे बसले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता चार पूर्णांक पाच इतकी नोंदवली गेली.

हवामान

नागपूरसह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्याने या आधीच दिला असून आज दुपारी नागपुरात मेघ गर्जनेसह पावसाने हजेरी लावली. उद्या नागपुर आणि पश्चिम विदर्भच्या जिल्ह्यात वादळी

पर्जन्यमान राहणार नसले तरीही अन्य जिल्ह्यांमध्ये वादळ आणि विजांसह पाऊस पडू शकतो. १२ जुलै पासून १४ जुलै पर्यंत सर्वत्र पावसाची शक्यता हवमान विभागाने वर्तवली आहे.